१७/५

# महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
एन-१२ सेक्टर,सिडको
औरंगाबाद-४३१००३

# प्रस्तावना

१. सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद या संस्थेची "नागरिकांची सनद" प्रसिध्द करतांना मला अतिशय आनंद तथा सार्थ अभिमान वाटत आहे. सध्याचे जग हे शैक्षणिक तसेच आर्थिक दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल करीत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर सुरू केलेल्या प्रशासकीय सुधारणांच्या कार्यक्रमात विविध शासकीय विभागाकडून नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक उपाययोजनांवर भर दिला जात आहे. राज्यातील नागरिक हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरविण्यात येणा-या विविध प्रकारच्या सेवा व योजनांची अंमलबजावणी करतांना पारदर्शकता, नियमाप्रमाणे काम, कालमर्यादा, कामाचा दर्जा, कार्यक्षमता राखणे व शासकीय सेवा पुरविण्यामध्ये स्तर निश्चित करून जबाबदारी निश्चित करणे इत्यादी बाबी "नागरिकांची सनद" या माध्यमातून साध्य करण्याची संकल्पना आहे. नागरिकांच्या सनदेचे लोकाभिमुखता, प्रतिसादशीलता, पारदर्शकता व गतिमानता हे महत्वाचे पैलू आहेत. त्याअनूषंगाने संपूर्ण संगणकीकरण करण्याकडे संस्थेची वाटचाल चालू आहे. पाल्यांना व त्यांच्या पालकांना संस्थेची माहिती, जाहिरात, संस्थेत दाखला घेण्यासाठी लागणारी शैक्षणिक व वैद्यकीय पात्रता इत्यादि बाबी घरबसल्या उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संस्था प्रयत्नशील आहे. शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्रीयन तरूणांना जास्तीत-जास्त संख्येने सेनादल, वायुदल व नौसेना यामध्ये अधिकारी म्हणून दाखल होण्यास प्रोत्साहित करण्यासाठी मार्गदर्शन करणे ही एक मोठी उपलब्धी ठरू शकेल अशी आशा वाटते.

२. या छोटेखानी पुस्तिकेत पहिल्या भागात संस्थेची सर्वसाधारण उभारणी, सुरूवात व आतापर्यंतची यशस्वी वाटचाल या बद्दल माहिती देण्यात आलेली आहे. दुस-या भागात प्रत्यक्ष नागरिकांची सनद देण्यात आली आहे. संस्थेची भूमिका, कार्यविषयक माहिती, सशस्त्र दलात अधिकारी म्हणून जाण्यासाठीची पात्रता, संस्थेत त्यासाठी देण्यात येणारे प्रशिक्षण, संस्थेत दाखल होण्यासाठी घेण्यात येणारी लेखी/तोंडी परिक्षा व त्यासाठी लागणारे कागदपत्रे यांचा समावेश राहील. सेवा विहित कालावधीत पुरविण्यात आल्या नाहीत तर कोणाकडे तक्रार/संपर्क साधावा त्या अधिका-यांचे पदनाम व दुरध्वनी क्रमांक देण्यात आले आहेत. मात्र मला खात्री आहे की, यात नमूद केल्यानूसार विहित कालावधीत आवश्यक माहिती/सेवा नागरिकांना उपलब्ध होईल.

दिनांक १५ [illegible] २०१[illegible]

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

(उदय एस पोळ)
ले.कर्नल (नि)
संचालक

## संस्थेचा पूर्व इतिहास

महाराष्ट्रातील काही सुज्ञ पालकांचे शिष्टमंडळ शासनाकडे जाऊन संरक्षण दलातील महाराष्ट्रातील मुलांची अधिकारी पदावरील अत्यल्प संख्या लक्षात घेता अधिकारी पदावरील महाराष्ट्रातील मुलांच्या संख्येत वाढ होण्यासाठी शासनाने काहीतरी ठोस उपाय योजना करावी म्हणून पालकांनी शासनास निवेदन सादर केले. ह्या अनूषंगाने महाराष्ट्र शासनाचे गृह विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक एसबी (III)एम एम एम/०६७३/२ दिनांक १२ जूलै १९७३ अन्वये लेफ्ट.जनरल एस पी पी थोरात (निवृत्त) किर्तीचक्र, पद्मश्री, डीएसओ यांच्या अध्यक्षतेखाली व ले.कर्नल व्ही.बी.साठे (निवृत्त) सदस्य, कर्नल ल.वा.आरज (निवृत्त), सदस्य सचिव ही समिति स्थापन करून त्यांनी या मागील कारणे शोधण्यास व त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यास सांगण्यात आले.

सदर समितीच्या महाराष्ट्रातील विविध भागात पाच बैठका झाल्या. झालेल्या बैठकीचा आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्रातील युवकांनी संरक्षण दलात अधिकारी पदावर न जाण्याची खालीलप्रमाणे काही ठळक कारणे समितीच्या निदर्शनास आली.

अ. हुशार आणि शारीरिक दृष्टया सक्षम महाराष्ट्रातील तरूण सशस्त्र दलातील कमी पगार व अस्थिर कौटुंबिक जीवन पाहून याकडे आकृष्ट होतांना दिसत नाहीत.

ब. ज्या मुलांची इच्छा सशस्त्र दलात अधिकारी म्हणून जाण्याची असते, त्यांचे इंग्रजी, सामान्यज्ञान व चालू घडामोडी विषयीचे ज्ञान कमी पडते.

क. आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे नागरी सेवेतील अधिकारी वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त होतो व सैन्यदलातील अधिकारी वयाच्या ४८/५० व्या वर्षीच सक्तीने सेवानिवृत्त होतो व नागरी जीवनात त्याला स्थायिक होण्यास किंवा दुसरी नोकरी मिळण्यास ब-याच अडचणींचा सामना करावा लागतो.

ड. आणखी बरीचशी कारणे आहेत परंतू योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन यांच्या अभावामुळे महाराष्ट्रातील तरूण सशस्त्र दलात जाण्यास अपात्र ठरतो हे मुख्य कारण आहे.

उपरोक्त नमूद सर्व कारणांचा विचार करून सदर समितीने असा निष्कर्ष काढला की फक्त थोड्या कालावधी करिता अहमदनगर येथे चालविलेले प्रशिक्षण, संरक्षण दलात अधिकारी म्हणून जाण्यासाठी पुरेसे नाही. त्यासाठी प्रत्येक महसूल विभागात (पुणे ,नागपूर, कोल्हापूर व औरंगाबाद) येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था स्थापन कराव्यात. ह्या संस्था निवासी असाव्यात व राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मध्ये जाण्याकरिता असलेले आवश्यक शिक्षण तसेच शारीरिक प्रशिक्षण यांची उत्तम सोय येथे करण्यात यावी.

शासनाने सदर समितीचा अहवाल ग्राह्य धरून १९७७ साली प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केली.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

23/5



१. **संस्थेची स्थापना व उद्दिष्ट**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील युवकांना संरक्षण दलात अधिकारी पदावर मोठ्या संख्येने जाता यावे या उद्देशाने जूलै १९७७ मध्ये सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केली. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या तरूणांना सुध्दा संधी मिळावी म्हणून शासनाने संस्थेसाठी पूर्ण आर्थिक तरतूद केलेली आहे ही संस्था संपूर्ण भारतात एकमेवाव्दितीय असून शासनातर्फे चालवली जाणारी एकमेव संस्था आहे. संस्थेचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील तरूणांना योग्य वयात उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण पुरवून सैन्य अधिकारी बनण्याकरिता लागणारे गुण व कौशल्य त्यांच्या अंगात भिनवणे हा आहे. ज्यामूळे ते संरक्षण दलात अधिकारी पदावर मोठ्या प्रमाणात जाऊ शकतील.

सैन्य दलात अधिकारी बनण्याकरीता लागणारी शैक्षणिक व शारीरिक पात्रता विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्टरित्या निर्माण करणे हे संस्थेचे एकमेव उद्दिष्ट आहे. संस्थेत दिले जाणारे प्रशिक्षण असे आहे की, जरी छात्र राष्ट्रीय प्रशिक्षण प्रबोधिनी मध्ये काही कारणास्तव दाखल होऊ शकला नाही तरी नागरी सेवेसाठी होणा-या परीक्षांमध्ये योग्यरित्या यशस्वी होतो.

२. **संरचना व नियंत्रण**

संस्था ही महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-२८,मूंबई यांच्या अधिपत्याखाली असून संस्थेच्या नियामक मंडळाच्या देखरेखी खाली आहे. संस्थेचे संचालक हे संस्थेच्या योग्य नियंत्रणासाठी नियामक मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव यांना जबाबदार आहेत.

३. **संस्थेचे नियामक मंडळ**

संस्थेचे नियामक मंडळ हे परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या प्रमाणे आहे.

४. **संस्थेची रचना**

संस्थेची रचना परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. संस्थेचे ठळक वैशिष्ट असे आहे की, संस्थेचे कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी बहुतेक करून माजी सैनिक आहेत. त्यांची यादी परिशिष्ट "क" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

संस्थेत एकही प्राध्यापक स्थायी नसून सर्व प्राध्यापकांना तासिका तत्वावर पाचारण करण्यात येते.

५. **संस्थेची उपलब्धी**

संस्थेची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत **११३७** छात्रामधून **४७५** छात्र संरक्षण दलात (वायूदल,सेनादल व नौदल) अधिकारी पदावर कार्यरत आहेत आणी ही टक्केवारी **४२%** इतकी आहे.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

## ६. संरक्षण दलात पदकांचे मानकरी

संस्थेच्या खालील माजी छात्रांना जे अधिकारी म्हणून संरक्षण दलात कार्यरत आहेत त्यांना शौर्य पदके मिळालेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ. | स्व.ले.कर्नल मनिष कदम | कीर्तीचक्र |
| आ. | स्व.मेजर मनिष पितांबरे | कीर्तीचक्र |
| इ. | कर्नल के.एम.शेंडे | शौर्यचक्र |
| ई. | कॅप्टन मिलींद मोकाशी | शौर्यचक्र |
| उ. | कॅप्टन मुकुंद सारासर | शौर्यचक्र |
| ऊ. | कर्नल अमिताभ वालावलकर | युद्ध सेवा मेडल(USM) |
| ए. | कर्नल अभिषेक बाजपेयी | सेनामेडल |
| ऐ. | कर्नल विक्रांत देसाई | सेनामेडल |
| ओ. | कर्नल केदार भिडे | सेनामेडल |
| औ. | कर्नल निरंजन जोग | सेनामेडल |
| अं. | कर्नल हितेंद्र मराठे | सेनामेडल* |
| अः | ले.कर्नल निनाद कुलकर्णी | सेनामेडल* |
| क. | स्क्वॉ.लिडर पराग डोंगरे | वायुमेडल |
| ख. | मेजर नवाब खान | सेनामेडल |
| ग. | मेजर राजेश कुलकर्णी | सेनामेडल |
| घ. | कॅप्टन अनिल काकडे | सेनामेडल |
| ह. | कॅप्टन चेतन दहावड | सेनामेडल |
| र. | कॅप्टन अभिजीत भांम्बरे | सेनामेडल |
| ल. | कॅप्टन एच.सी.आसुदने | सेनामेडल |

७. **संस्थेतील उपलब्ध शिक्षण व प्रशिक्षण**

संस्थेत दाखल झालेल्या छात्रांना औरंगाबाद येथील सी.बी.एस.ई. महाविद्यालयात प्रवेश दिला जातो. प्रवेश दिल्यानंतर सदर महाविद्यालयात छात्र विज्ञान शाखेत ११वी व १२वी पर्यंत शिक्षण घेतात.

८. **संघ लोकसेवा आयोग परीक्षा**

संघ लोकसेवा आयोगाकडून (UPSC) घेतल्या जाणा-या NDA च्या प्रवेश परीक्षेची तयारी संबंधीत विषयाच्या तज्ञ प्राध्यापकांचे खास वर्ग सुमारे १५-१६ महिने आयोजित करून तसेच सराव परीक्षा घेऊन करून घेतली जाते. छात्रांची वेळोवेळी सराव परीक्षा घेऊन याव्दारे त्यांचे मनोबल व परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्याकडे विशेष लक्ष दिले जाते. छात्रांच्या ११वी व १२वी परीक्षेपूर्वी त्यांचे खास वर्गाचे आयोजन करून या परीक्षेची तयारी सुध्दा करून घेतली जाते. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) च्या परीक्षा वर्षातून दोन वेळेस सप्टेंबर आणि एप्रिल या महिन्यात होतात.

संरक्षण सेवा निवड मंडळ (SSB) च्या मुलाखतीला जाण्यापूर्वी १५ ते २० दिवस छात्रांचे खास शिकवणी वर्ग (Capsul Training) संचालक/संरक्षण दलातील माजी तज्ञ अधिकारी यांच्या व्दारे घेतले जातात. यामध्ये त्यांची शारीरिक क्षमता व मुलाखतीची तयारी करवून घेतली जाते. तसे पाहिले असता छात्रांची व्यक्तिमत्व विकास ही पक्रिया छात्र संस्थेत रूजू झाल्यापासून सुरू झालेली असते. छात्रांचा व्यक्तिमत्व विकास नैसर्गिकरित्या होण्यासाठी दैनंदिन कार्यक्रमात याचा समावेश जाणीवपूर्वक केला जातो.

९. **संस्थेतील प्रवेश प्रक्रिया**

खालील पात्रता धारण केलेले इयत्ता १०वी च्या वर्गात शिकत असलेले महाराष्ट्र राज्याचे रहिवासी विद्यार्थी ह्या संस्थेच्या लेखीपरीक्षेसाठी बसण्याकरिता पात्र आहेत.

अ. **वय** : विद्यार्थी त्यावर्षी १ जून रोजी १४.५ ते १६ या वयोगटातला असावा.

ब. **आरक्षण** : संस्थेत कुठल्याही प्रवर्गाकरिता आरक्षण लागू नाही.

क. **शैक्षणिक पात्रता** : छात्र इयत्ता १०वी वर्गात शिकत असावा.

ड. **शारीरिक क्षमता** : छात्र शारीरिक तसेच मानसिक रित्या सुदृढ असावा व राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) तर्फे नियमीत केलेल्या शारीरिक स्तराचा असावा.

इ. **परीक्षा फॉर्म** : संस्थेची जाहिरात दरवर्षी माहे सप्टेंबर ते डिसेंबर मध्ये सर्व प्रमुख वर्तमानपत्रात पसिध्द केली जाते. ईच्छुक छात्र हस्तलिखीत किंवा ऑनलाईन पध्दतीने परीक्षा फॉर्म भरू शकतात. परीक्षा फॉर्म चे शुल्क रू. ४५०/- धनाकर्ष, चलान किंवा ऑनलाईन पध्दतीने भरू शकतात. धनाकर्ष (DD) संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद यांच्या नावाने काढून तो भरलेल्या फॉर्म बरोबर संस्थेच्या पत्त्यावर पाठवावा.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

ई. **परीक्षेचे आयोजन** : पात्र छात्रांना लेखी परीक्षेकरिता पाचारण करण्यात येते. पात्र छात्रांची लेखी परीक्षा माहे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून नागपूर,पुणे,कोल्हापूर व औरंगाबाद या चार ठिकाणी घेण्यात येते. दरवर्षी लेखीपरीक्षेचा अनुक्रम बदलण्यात येतो. लेखी परीक्षा ही बहुपर्यायी प्रश्नांच्या स्वरूपातील एस.एस.सी व सी.बी.एस.ई च्या अभ्यासक्रमानुसार गणित, भूमिती, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व भौतिकशास्त्र तसेच इंग्रजी व्याकरण, इतिहास, भुगोल व सामान्यज्ञान ह्या विषयावर आधारीत १५० गुणांची असते. त्यामध्ये एक पेपर हा गणिताचा ७५ मार्कांचा व दुसरा पेपर हा गॅट (General Ability Test) ७५ मार्कांचा असतो. लेखी परीक्षेत उत्तीर्ण श्रेणी ही ६०% इतकी निर्धारीत आहे.

उ. **अंतिम निवड** : संस्थेच्या लेखी परीक्षेत ६०% घेवून उत्तीर्ण झालेल्या छात्रांना मौखिक मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. लेखी व मौखिक मुलाखतीवरील गुणांवर छात्रांची अंतिम निवड केली जाते. संस्थेत निवड झालेल्या छात्रांना माध्यमिक शालांत परिक्षेत (इ.१०वी) ६०% टक्के गुण प्राप्त झाले असतील तरच संस्थेत प्रवेश दिला जातो.

१०. **संस्थेतील दैनंदिन कार्यक्रम**

**संस्थेचे शैक्षणिक सत्र** : संस्थेचे पहिले सत्र हे जून ते ऑक्टोंबर व दूसरे सत्र नोव्हेंबर ते एप्रिल अश्या दोन शैक्षणिक सत्रांमध्ये दुभागले आहे. या दोन सत्रातील कालावधी मध्ये छात्रांना सुट्टी दिली जाते.

**शारीरिक प्रशिक्षण व खेळ** : संस्थेतील प्रत्येक छात्राला सकाळी शारीरिक प्रशिक्षण व कवायत असे ४० मिनीटांचे प्रशिक्षण घेणे जरूरी असते. सांयकाळी ४५ मिनीटांचे खालील दिलेले खेळ खेळणे आवश्यक असते.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | मुष्ठी युध्द | ब. | हॉकी |
| क. | फुटबॉल | ड. | बास्केट बॉल |
| इ. | व्हॉलीबॉल | ई. | ५ मैल धावणे |

संस्थेतील छात्रांना उपलब्ध सेवा : संस्थेतील गृहरक्षकांच्या देखरेखी खाली प्रत्येक छात्राला कमीत कमी ३००० कॅलरीज प्रत्येक दिवशी मिळतील असे भोजन दिले जाते. त्यासाठी भोजनाचे नियोजन तसेच वेळापत्रक गठीत केलेल्या समितीव्दारे तयार केले जाते. व त्यानूसार त्यांना खालीलप्रमाणे पोषक आहार दिला जातो. भोजनामध्ये आठवड्यातून दोन वेळेस नॉनव्हेज व एक वेळेस अंडी दिली जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | सकाळचा चहा | ब. | बोर्नव्हिटा दुध व बिस्कीट |
| क. | नास्ता | ड. | दुपारचे भोजन |
| इ. | दुपारचा चहा सोबत फ्रुट | ई. | रात्रीचे भोजन |

सेवापूर्व शिक्षण संस्था महाराष्ट्र शासन औरंगाबाद

**धोबी शॉप व केशकर्तनाची सुविधा**: नमूद केलेल्या दोन्ही सुविधा छात्रांना संस्थेत उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

**औषधी** : प्रत्येक छात्राचे वैद्यकीय परीक्षण संस्थेने निर्धारित केलेल्या वैद्यकीय अधिका-याव्दारे आठवड्यातून दोन वेळा करण्यात येते. तसेच गरज भासल्यास तातडीने शासकीय दवाखान्यामध्ये किंवा खाजगी दवाखान्यात पाठविण्यात येते,जेणेकरून छात्रांना योग्य वेळेस योग्य उपचार करणे शक्य होते.यावेळेस छात्राला जो खर्च येतो तो त्यांना स्वत: भागवायचा असतो.

११. **शुल्क व शिष्यवृत्ती**

अ. छात्रांच्या पालकांकडून माहे फेब्रुवारी २०१७ पासून रू.३०००/-प्रति महिना.

ब. शासनाकडून माहे फेब्रुवारी २०१७ पासून रू.२०००/-प्रति महिना.

**संरक्षीत ठेव** : खूल्या प्रवर्गातील छात्रांना संस्थेत प्रवेश घेतेवेळेस रू.३०००/-सुरक्षाठेव रक्कम व अनूसुचीत जाती (एस.सी.) च्या छात्रांना रू.१५००/- इतकी रक्कम जमा करावी लागते.

**महाविद्यालयाचे शुल्क** : सी.बी.एस.ई.महाविद्यालयाचे शुल्क छात्रांना प्रत्येक वर्षी स्वत: भरावे लागते.

**विमा** : छात्र जेंव्हा संस्थेत दाखल होतात तेंव्हा छात्रांजवळ एक,जनता दुर्घटना या नावाने रू.१,००,०००/-चा विमा काढलेला असावा तसेच मेडीक्लेम या नावाने सुध्दा रू.२५,०००/-चा विमा काढलेला असावा.(ही पालकांची जबाबदारी आहे. संस्था ही सेवा पुरवीत नाही)

१२. **संस्थेची अनन्यसाधारणता व अव्दितीयता**

अ. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी,पुणे येथे फक्त दोन वर्षाच्या तयारीनिशी पाठविणारी ही महाराष्ट्र शासनाची भारतातील पहिली संस्था आहे. ही अकरावीच्या विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिक दृष्टच्या परिपक्व करून त्यांना संरक्षण दलात जाण्यासाठी त्यांच्या मनाची तयारी करून घेते. आर.आय.एम.सी.,डेहराडून,सैनिकी शाळा आणि मिलीट्री शाळा यामध्ये मुले अतिशय लहान वयात म्हणजे इयत्ता ६ वी, ७ वी व ८ वी च्या वर्गात घेतली जातात,त्यामुळे त्यांना भविष्यात संरक्षण दलात जावे किंवा नाही याचा निर्णय घेता येत नाही.

ब. छात्रांवरती वैयक्तिकरित्या लक्ष देण्यास संस्थेमध्ये छात्र व संस्थेचे कर्मचारी यांचे प्रमाण १:३ असल्यामुळे छात्रांकडे योग्य लक्ष पुरविणे शक्य होते.

क. संस्थेचे कर्मचारी माजी सैनिक असल्यामुळे संस्थेतील कार्याला एक वेगळे पोषक वातावरण होण्यास मदत मिळते.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था महाराष्ट्र शासन औरंगाबाद

ड.  छात्रांची योग्य वयात निवड करून संस्थेत दाखल झाल्यानंतर त्यांची संरक्षण दलात जाण्याची संपूर्ण मानसिक तयारी करून घेतली जाते.

इ.  संरक्षण दलाच्या विविध प्रबोधिनींमध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांची जाण्याची टक्केवारी ४३% असून ही टक्केवारी संस्था १९७७ साली स्थापन झाल्यापासूनची आहे.

ई.  महाराष्ट्र शासनाचे संपूर्ण अनुदान असल्यामुळे छात्रांच्या पालकांकडून इतर याप्रकारच्या खाजगी संस्थेंच्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात शुल्क आकारणी केली जाते.

उ.  छात्रांची निवड अतिशय काटेकोरपणे निवड समितीव्दारे केली जाते,ज्यामध्ये एक निवृत्त लेफ्ट.जनरल, दोन मेजर जनरल, दोन ब्रिगेडिअर व एक कर्नल यांचा समावेश असतो.

**समारोप**

छात्रांच्या सर्वांगीण मानसिक व शारीरिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी औरंगाबाद येथे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. छात्रांच्या महाविद्यालयीन शिक्षणासोबतच त्यांच्या मध्ये सैन्य अधिका-याला आवश्यक असलेले नेतृत्व गुण संस्थेतील त्यांच्या वास्तव्यात अंगी रूजू घातले जातात. या सर्वांमुळे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) मध्ये जास्त संख्येने छात्र पाठविणारी संस्था असून, जास्तीत-जास्त संख्येने महाराष्ट्रातील युवकांना संरक्षण दलात अधिकारी पदावर रूजू करण्यास ही संस्था कटीबध्द आहे.

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

## भाग-२ नागरीकांची सनद

### (१०) सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद या संस्थेकडून पुरविल्या जाणा-या सेवा,त्यासाठी आवश्यक कागदपत्रे,कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी इ.

| अ.क्र. | संस्थेकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी | विहीत कालावधीत सेवा पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | ह्या कार्यालयाकडून संस्थेत प्रवेश घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना,नागरिकांना संस्थेमध्ये प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक पात्रते संबधीत माहिती पुरविली जाते.तसेच प्रवेश प्रक्रिये संबधी दरवर्षी राज्यातील शिक्षण अधिकारी,व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी व वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालयनालय,मुंबई मार्फत पाठविण्यात येते. | संस्थेच्या लेखी परीक्षेचा अर्ज करण्यासाठी छात्र हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.त्यासाठी डोमिसाईल प्रमाणपत्र आवश्यक आहे. परीक्षा अर्जाची किंमत रू.४५०/- इतकी आहे. | नागरिकांनी/विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष संस्थेत भेट दिल्यास तात्काळ माहिती विनामूल्य पुरविली जाते.तसेच शैक्षणिक संस्था असल्यामूळे संस्थेच्या लेखी परीक्षेसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे संस्थेच्या जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या तारखेप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांना पोस्टाव्दारे पाठविली जातात. उदा.हॉलतिकीट. | सदरहू जबाबदारी ही अधीक्षक-नि-लेखापाल वर्ग-२ तसेच त्यांच्या अधिनस्त छात्र विभागाची कार्य व जबाबदारी हाताळणारा कर्मचारी यांची आहे. | संचालक,सैनिकी सेवापूर्व शिक्षण संसथा,एन-१२ सेक्टर,सिडको,औरंगाबाद दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३८१३७० |

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

प्रपत्र "अ"


## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेचे नियामक मंडळ (GOVERNING BODY)

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | लेफ्ट.जनरल व्ही.जी.पाटणकर,निवृत्त,PVSM,UYSM,VSM | चेअरमन |
| २. | मेजर जनरल एस.डी.सोहनी,निवृत्त | सभासद |
| ३. | मेजर जनरल एस.जी.पित्रे,निवृत्त | सभासद |
| ४. | मेजर जनरल व्ही.पी.पवार,निवृत्त,AVSM,VSM. | सभासद |
| ५. | कमोडोर बी.एस.करपे,निवृत्त | सभासद |
| ६. | एअर कमोडोर आर.एच.कर्वे,निवृत्त | सभासद |
| ७. | स्टेशन कमांडर,औरंगाबाद | पदसिध्द सभासद |
| ८. | विभागीय आयुक्त,औरंगाबाद | पदसिध्द सभासद |
| ९. | संचालक,सैनिक कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य | पदसिध्द सभासद |
| १०. | संचालक,सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद | सभासद सचिव |

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

प्रपत्र "ब"

# सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था (ORGANISATION CHART)




सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद

**Total Strength Class Wise**

| I | II | III | IV | Total |
|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 09 | 12 | 24 |

१०१५

<u>प्रपत्र "क"</u>

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,औरंगाबाद कर्मचा-यांची यादी

| अ.क्र. | सैन्यातील पद | कर्मचा-याचे नांव | संस्थेतील पद | सैन्य सर्व्हीस | जन्म दिनांक | नियुक्तीचा दिनांक | निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Lt Col | उदय एस पोळ | संचालक वर्ग-१ | EME | ०५/१०/१९६० | ०७/१०/२०१४ | ३१/१०/२०१८ |
| २. | एम.पी.एस.सी | रविंद्र वा.भुरचंडी | अधीक्षक-नि-लेखापाल वर्ग-२ | - | १५/०९/१९६२ | १५/०४/१९९९ | ३०/०९/२०२० |
| ३. | JWO | राजू शं.मानेकर | गृहरक्षक वर्ग-२ | Air Force | १२/०१/१९६४ | १५/१२/२०१२ | ३१/१२/२०२२ |
| ४. | Hav/Clk | सुभाष श हरकळ | लेखालिपिक | EME | १५/०९/१९६२ | ०१/०४/२००२ | ३०/०९/२०२० |
| ५. | Hav/Clk | संजय स महाजन | वरिष्ठलिपिक | AOC | ०९/११/१९६८ | १८/०३/२००८ | ३०/११/२०२६ |
| ६. | Hav | विजय एम गोरे | क्लर्क कम टायपिस्ट | MLI | ३०/०३/१९७७ | २२/०८/२०१३ | ३०/०३/२०३५ |
| ७. | Hav/Clk | विष्णू बी गोराडे | क्लर्क कम टायपिस्ट | Arty | ०७/०८/१९७० | २२/०८/२०१३ | ३१/०८/२०२८ |
| ८. | Hav/Clk | प्रकाश सु.कुलकर्णी | लघुलेखक उच्चश्रेणी | GR Regt | २५/०६/१९७० | १७/०४/२००६ | ३०/०६/२०२८ |
| ९. | Nk/Opr | बाबासाहेब ना.नलावडे | शा.प्र.नि. | Arty | ०१/०७/१९६२ | ०१/०४/२००२ | ३०/०६/२०२० |
| १०. | Nk/MT | प्रकाश पी देशपांडे | वाहनचालक | ASC | १८/०८/१९६७ | २०/१२/२०११ | ३०/०८/२०२५ |
| ११. | Civilian | अरूण दी.लोहार | सुतार | - | १०/०६/१९६० | १६/०९/१९८५ | ३०/०६/२०१८ |
| १२. | NK-GD | सुधाकर सी.सुरलकर, सेनामेडल | शिपाई | MLI | १३/०५/१९६१ | २८/०९/२००५ | ३१/०५/२०२१ |
| १३. | Hav/GD | रामदास जी.मालकर | शिपाई | MLI | ०१/०१/१९७० | २०/१२/२०११ | ३१/१२/२०३० |
| १४. | Hav/Dvr | रतिराम जी चौहाण | पहारेकरी | Armd Corps | ०१/०६/१९५७ | ०१/०४/२००२ | ३१/०५/२०१७ |
| १५. | Nk/GD | श्रीहरी ना.चव्हाण | पहारेकरी | MLI | ०१/०९/१९७१ | २२/०८/२०१३ | ३१/०८/२०३१ |
| १६. | Civilian | अरूण व्ही.सुरडकर | स्त्यंपाकी | - | १२/०३/१९६० | ०३/१०/१९७८ | ३१/०३/२०२० |
| १७. | Sep/Cook | शिवाजी मु.गुंड | स्वयंपाकी | Punjab regt | २५/०२/१९७० | १९/१२/२००० | २८/०२/२०३० |
| १८. | Civilian | राजेंद्र रा लोहोट | सफाईगार | - | १०/०४/१९६८ | २६/०६/१९९० | ३०/०४/२०२८ |
| १९. | NK/Safai | प्रताप आर सुरडकर | सफाईगार | AMC | ०५/०६/१९६४ | २९०/०९/२०१४ | ३०/०६/२०२४ |
| २०. | Nk/Dvr MT | कैलास कौ काकडे | सफाईगार-नि पहारेकरी | AMC | २०/०६/१९६६ | १४/११/२००९ | ३०/०६/२०२६ |
| २१. | Civilian | सुधाकर भा वाघुले | ग्राऊंडस्मन | - | ०७/०१/१९५९ | ०१/१२/१९८५ | ३१/०१/२०१९ |
| २२. | Civilian | गणेश आर घुगे | माळी | - | ०९/०६/१९६४ | २४/१२/१९९० | ३०/०६/२०२४ |

दोन पदे रिक्त आहेत लिपिक-१ वर्ग-३ व मसालची -१वर्ग-४

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
महाराष्ट्र शासन
औरंगाबाद